MHBU070015182022

| | | | |
|---|---|---|---|
| दाखल दि. | ०६.१०.२०२२ | | |
| नोंदणी दि. | ०६.१०.२०२२ | | |
| निकाल दि. | १६.०९.२०२५ | | |
| कालावधी | ०२ वर्ष | ११ म. | १० दि |

*सि.एन.आर.क्र.एम.एच.बी.यु.०७-००१५१८-२०२२*

**फौजदारी नियमावलीचे प्रकरण XXXIII मधील नमुना क्र. XXXII प्रमाणे**

**भाग –'अ'** **नि.क्र.४०.**

(न्यायनिर्णयाचे मुखपृष्ठ)

(फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (i))

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय क्र.०१, शेगाव, जि. बुलढाणा यांचे न्यायालयात**

**पिठासीन अधिकारी एन. डी. मेश्राम**

(निकाल दिनांक १६.०९.२०२५)

**नियमीत फौजदारी प्रकरण क्र. १७१/२०२२**

गुन्हा क्र. १८५/२०२२ कलम ३६३ सह कलम ३४ अन्वये भारतीय दंड संहिता, १८६०, पोलीस ठाणे शेगाव शहर.

**अभियोग पक्ष** महाराष्ट्र सरकार तर्फे
पोलिस ठाणे अधिकारी,
पोलिस ठाणे, शेगाव शहर, ता. शेगाव, जि. बुलढाणा.

**सरकार तर्फे विद्वान वकील श्रीमती एस. व्ही. इंगळे.**

**आरोपी.** १. शाम सुधाकर इंगळे,
वयः २७ वर्षे, धंदाः मजुरी,
२. अभिषेक अनिल वासनकार,
वयः १९ वर्षे, धंदाः खाजगी नोकरी,
दोघे रा. आगर, ता.जि. अकोला.

**आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. बी. यु. ब्राम्हणे.**

**भाग– ब**

फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii)

| | |
|---|---|
| गुन्ह्याची तारीख | दि. ३०.०४.२०२२ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | दि. ३०.०४.२०२२ |
| दोषारोप पत्र दाखल तारीख | दि. ०६.१०.२०२२ |
| दोषारोप पत्र निश्चीत तारीख | दि. ०४.०१.२०२३ |
| पुरावा सुरू झाला ती तारीख | दि. १२.०९.२०२५ |
| प्रकरण न्यायनिर्णयाकरीता ठेवले ती तारीख | दि. १६.०९.२०२५ |
| न्यायनिर्णय देण्याची तारीख | दि. १६.०९.२०२५ |
| शिक्षेची तारीख व इतर काही | --- |

**आरोपींचा तपशिल**

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जमानतीवर सोडल्याची तारीख | दोषारोपा मधील कलम | आरोपी निर्दोष किंवा दोषी | दिलेली शिक्षा | कलम ४२८ फौ.प्र.सं प्रमाणे शिक्षेमधुन सुट मिळण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | शाम सुधाकर इंगळे | दि. ०१.०५. २०२२ | दि. ०२.०५. २०२२ | कलम ३६३ सह कलम ३४ भा.दं.वि. | निर्दोष | -- | -- |
| २ | अभिषेक अनिल वासनकार | दि. १२.०५. २०२२ | दि. १२.०५. २०२२ | कलम ३६३ सह कलम ३४ भा.दं.वि. | निर्दोष | -- | -- |

**भाग– क**

फौजदारी नियमावलीचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii)

अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी

अ) अभियोग पक्षः–

| स्थान | नाव | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| सा.क्र.१ | गजानन नथ्थु पांडव | नि.क्र. ३४ | फिर्यादी |
| सा.क्र.२ | नेहा गजानन पांडव | नि.क्र. ३७ | पिडीता साक्षीदार |

ब) बचाव पक्ष असल्यासः–

| अ.क्र. | नाव | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| - | - | - | - |

क) न्यायालयीन साक्षीदार असल्यासः–

| अ.क्र. | नाव | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| - | - | - | - |

अभियोग पक्ष/ बचाव पक्ष/ न्यायालयीन कागदपत्रांची / निशाणी क्रमांक देण्यात आलेल्या दस्तांची यादी

अ) अभियोग पक्षः–

| अ.क्र. | निशाणी | दस्तऐवजांचे स्वरुप |
|---|---|---|
| - | -- | -- |

ब) बचाव पक्षः–

| अ.क्र. | निशाणी | दस्तऐवजांचे स्वरुप |
|---|---|---|
| - | - | - |

क) न्यायालयीनः–

| अ.क्र. | निशाणी | दस्तऐवजांचे स्वरुप |
|---|---|---|
| - | - | - |

ड) भौतीक वस्तुः–

| अ.क्र. | निशाणी | दस्तऐवजांचे स्वरुप |
| --- | --- | --- |
| -- | -- | -- |

**न्यायनिर्णय**

(दि. १६.०९.२०२५ रोजी घोषित)

आरोपींविरुध्द प्रस्तुत खटला भारतीय दंड विधानाचे कलम ३६३ सह कलम ३४ अन्वये चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात तथ्य खालील प्रमाणे आहे–**

२. फिर्यादी गजानन नथ्थु पांडव हे व्यंकटेश नगर, शेगाव येथे राहतात व मजुरीचे काम करतात. त्यांना दोन मुले व एक मुलगी असे अपत्ये आहेत. त्यांची मुलगी कु. नेहा गजानन पांडव हीचे वय १५ वर्षे ०४ महिने होते. नेहा ही महात्मा फुले शाळेमध्ये शिकत होती व ती ९ वी मधून १० वीत गेली होती.

३. दिनांक ३०.०४.२०२२ रोजी रात्री ०१.०० ते ०१.३० वाजताच्या सुमारास फिर्यादी व त्यांच्या घरातील सर्व जण घरात झोपलेले असतांना त्यांचा मुलगा कमलेश याच्या मोबाईलवर शेजारी राहणारे लक्ष्मण गवई यांनी फोन केला व सांगितले की, तुमचे घरात कोणाची तब्येत खराब आहे का. तेव्हा फिर्यादीने त्यांना सांगितले की, त्यांच्या घरी कोणीच आजारी नाही, तुम्ही एवढ्या रात्रीला का अस विचारत आहे. तर लक्ष्मण गवई यांनी सांगितले की, तुमचे घरासमोर आता एक मोटारसायकल उभी होती व त्यावर दोन मुले होते व तुमची बहीण घरातून बाहेर आली व गाडीवर ती मुलांसोबत बसून गेली, मोटारसायकल भरधाव वेगात गेली मला वाटले की, तुमच्या बहीणीला दवाखान्यात नेले की काय म्हणून विचारत आहे. तेव्हा फिर्यादी व त्यांचे आई वडीलांनी नेहा हिला घरात पाहिले असता ती दिसली नाही. तेव्हा पासून नेहा हिचा त्यांनी शेगाव परिसरात व नातेवाईकांकडे शोध घेतला परंतु ती मिळून आली नाही. त्यामुळे

फिर्यादीने आरोपींविरुध्द पो.स्टे. शेगाव शहर येथे तोंडी फिर्याद दिली.

४. फिर्यादी यांच्या वरील फिर्यादवरुन पोलीस ठाणे, शेगाव शहर, येथे अपराध क्र. १८५/२०२२ नुसार आरोपींविरुध्द भा.दं.वि. कलम ३६३ सह कलम ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्ह्याचा तपास सहाय्यक फौजदार गजानन गावंडे यांच्याकडे वर्ग करण्यात आला. त्यानंतर तपास अधिकारी यांनी घटनास्थळावर जाऊन घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले व आरोपींना अटक केली आणि तपासाअंती आरोपींविरुध्द पुरावा मिळुन आल्याने वरील कलमांन्वये दोषारोप पत्र दाखल केले.

५. माझ्या पुर्व पिठासीन अधिका-यांनी आरोपींविरुध्द नि.क्र.१६ अन्वये भा.दं.वि. कलम ३६३ सह कलम ३४ नुसार दोषारोप ठेवले. त्यातील मजकुर आरोपींना त्यांच्या मातृभाषेतुन वाचुन व समजावुन सांगीतला. आरोपींनी गुन्हा नाकबुल करुन संपरीक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. आरोपींविरुध्द खटला चालवित असतांना गुन्ह्या संदर्भात विधाने न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ प्रमाणे आरोपींची जबानी नोंदविण्यात आली नाही.

६. अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती एस. व्ही. इंगळे यांचा तर आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. बी. यु. ब्राम्हणे यांचा युक्तीवाद ऐकला.

७. अभिलेखावर आलेल्या लेखी व तोंडी पुराव्यावरुन माझ्यासमक्ष खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालील प्रमाणे देत आहे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की दिनांक ३०.०४.२०२२ रोजी रात्री ०१.०० ते ०१.३० वाजेच्या दरम्यान फिर्यादीचे | |

| | | |
|---|---|---|
| | राहत्या घरुन, शेगाव, ता. शेगाव, जि. बुलडाणा येथे आरोपींनी संगणमताने फिर्यादीच्या अल्पवयीन मुलीचे तिच्या संमतीशिवाय अपहरण केले व त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३६३ सह कलम ३४ प्रमाणे गुन्हा केला ? | **.. नाही** |
| २. | आदेश काय ? | **.. आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले.** |

## कारणमिमांसा

८. सरकार पक्षाने आरोपींविरुध्द दोषारोप सिद्ध करण्यासाठी एकुण दोन साक्षीदार तपासले. फिर्यादी सा.क्र.१ गजानन नथ्थु पांडव यांना नि.क्र.३४ व पिडीता सा.क्र. २ नेहा गजानन पांडव हिला नि.क्र. ३७ वर तपासले. फिर्यादी, पिडीता व आरोपींनी नि.क्र.३२ वर संयुक्त पुरसीस देऊन त्यांच्यामध्ये न्यायालया बाहेर तडजोड झाली असल्याचे सांगीतले. या पार्श्वभुमीवर अभियोग पक्षाच्या पुराव्याचे खालीलप्रमाणे विवेचन करण्यात येत आहे.

**मुद्दा क्र. १ करीताः–**

९. अभियोग पक्षाचे फिर्यादी साक्षीदार क्र. १ गजानन नथ्थु पांडव यांनी त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले की, त्यांना दोन मुले व एक मुलगी आहे. नेहा ही त्यांची सर्वात लहान मुलगी आहे. घटनेच्या वेळेस त्यांची मुलगी कसुरा येथील महात्मा फुले शाळेत १० व्या वर्गात होती. दिनांक ३०.०४.२०२२ रोजी काय घडले होते हे त्यांना आठवत नाही. त्यांनी का रिपोर्ट दिला हे आता त्यांना आठवत नाही. त्यांना या प्रकरणात समन्स प्राप्त झाला होता. त्यांना प्राप्त झालेल्या समन्सवर त्यांचीच सही आहे. पोलीस स्टेशनला दिलेल्या रिपोर्टवर त्यांचीच सही आहे. दोन्ही सह्या वेगवेगळ्या असल्याचे कारण त्यांना सांगता येणार नाही. रिपोर्टवर इंग्रजीमध्ये सही आहे व समन्सवर मराठीमध्ये सही आहे. त्या दोन्ही सह्या त्यांच्याच आहेत. सदर

साक्षीदाराने फिर्याद व छापील खबरेवरील त्यांच्या सह्या ओळखल्या परंतु त्यातील मजकुर त्यांना माहिती नसल्याचे सांगीतले.

१०. पुढे अभियोग पक्षाची सा.क्र. २ नेहा गजानन पांडव हिने तिच्या पुराव्यादरम्यान कथन केले की, आजरोजी ती तिच्या वडीलांसोबत न्यायालयात आलेली आहे. न्यायालयात उपस्थित असलेल्या आरोपींना ती ओळखत नाही. तिच्या वडीलांनी कशाबाबत रिपोर्ट दिला होता याची तिला माहिती नाही. आजरोजी तिची साक्ष कोणत्या प्रकरणात आहे ते सुध्दा तिला माहिती नाही.

११. वरील दोन्ही साक्षीदार अभियोग पक्षाला सहकार्य करीत नसल्याने सरकारी अभियोक्ता यांनी दोन्ही साक्षीदारांना फितुर घोषीत करुन सुचक प्रश्न विचारले. सरकारी वकीलांनी विचारलेल्या सर्व सुचक प्रश्नांना साक्षीदाराने नकारार्थी उत्तरे दिले. साक्षीदार क्र. २ नेहा पांडव हिच्या साक्षीदरम्यान फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १६४ अंतर्गत नोंदविले बयाण नि.क्र.३९ अन्वये सिध्द करण्यात आलेले आहे. नि.क्र. ३९ चे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, साक्षीदाराने आरोपींनी तिला पळवून नेल्याचे कोठेही कथन केले नाही. तसेच साक्षीदार अभियोग पक्षाला सहकार्य करीत नसेल तर त्याचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम १६४ अंतर्गत नोंदविलेला जबाब हा पुरावा म्हणून ग्राह्य धरता येत नाही. त्यामुळे आरोपींविरुध्द कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही.

१२. अभियोग पक्षाच्या साक्षीदार क्रमांक १ व २ यांच्या साक्षीचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की फिर्यादी, साक्षीदार व आरोपी यांच्या मध्ये न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे. सा.क्र. १ व २ यांच्या साक्षीमध्ये सुध्दा आरोपींविरुध्द कोणताही गुन्हा दर्शक पुरावा अभिलेखावर आला नाही.

१३. अभियोग पक्षाच्या साक्षीदारांच्या साक्षीवरुन आरोपींविरुध्द कोणताही गुन्हा दर्शक

पुरावा आला नाही. त्यामुळे सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. तसेच आरोपीं व फिर्यादी यांची न्यायालया बाहेर तडजोड झालेली आहे व त्यासंदर्भातील पुरसीस नि.क्र. ३२ वर दाखल करण्यात आलेली आहे. अभियोग पक्षाने आरोपींविरुध्दचा गुन्हा संशयाच्या पलीकडे सिध्द न केल्यामुळे आरोपीं निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. त्यामुळे मी मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र. २ च्या अनुषंगाने खालीलप्रमाणे अंतीम आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. आरोपी क्र. १. शाम सुधाकर इंगळे व आरोपी क्र. २. अभिषेक अनिल वासनकार, यांची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३६३ सह कलम ३४ च्या शिक्षापात्र गुन्ह्यातुन निर्दोष मुक्तता करण्यात आली.

२. आरोपींनी फौ.प्र.सं. कलम ४३७–अ प्रमाणे प्रत्येकी रुपये २५,०००/– चा जामीन व वैयक्तीक मुचलका द्यावा. सदरचा जामीन व वैयक्तीक मुचलका पुढील सहा महिन्यापर्यंत वैध राहिल.

३. सदर गुन्हयात जप्त असलेली मोटारसायकल सुपूर्दनामा बॉन्डवर देण्यात आलेली आहे. सदर सुपूर्दनामा बॉन्ड रद्द करण्यात येतो.

४. आरोपीचा जामीन बंधपत्र व वैयक्तीक मुचलका रद्द करण्यात येतो.
(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात घोषीत करण्यात आला.)

NITIN MESHRAM
Digitally signed by NITIN MESHRAM
Date: 2025.09.16 15:17:10 +0530

**[एन. डी. मेश्राम]**

दि. १६.०९.२०२५.

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
शेगाव.

**प्रमाणपत्र**

मी पी. के. इंगळे लघुलेखक, (न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,कोर्ट क्र.१ शेगांव, ता. शेगांव, जिल्हा बुलडाणा.) याची पुष्टी करतो की, या पी.डी.एफ.ची सामग्री ही मुळ न्यायनिर्णयाच्या शब्दाप्रमाणेच शब्द आहे.

न्यायनिर्णयाची तारीखः - १६.०९.२०२५.

मा. पिठासीन अधिकारी यांनी

न्यायनिर्णयावर सही केल्याची तारीखः - १६.०९.२०२५.

न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीखः - १६.०९.२०२५.